RNI No. MAHBIL/2009/35527
Reg. No. MH/MR/South-343/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-क

वर्ष ४, अंक १९] शुक्रवार, जुलै २०, २०१२/आषाढ २९, शके १९३४ [पृष्ठे ५

किंमत : रुपये १३.००

असाधारण क्रमांक ४०

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हा दंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**अन्न सुरक्षा आयुक्त**

**अन्न व औषध प्रशासन,**

महाराष्ट्र शासन,

सर्व्हेक्षण क्रमांक ३४१, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१,

दिनांक १९ जुलै २०१२.

**आदेश**

**अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम, २००६**

क्रमांक असुका/अधिसूचना/६८६/२०१२/७.—ज्याअर्थी, सन २००३ ते २०११ या कालावधीत गुटखा व पानमसाला यांच्या ११७३ तपासणीसाठी आणि विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या नमुन्यापैकी ११५३ नमुन्यांमध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट हा घटक असल्याचे आढळून आले होते ;

आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ (२००६ चा ३४) याच्या तरतुदींन्वये घेण्यात आलेल्या गुटखा व पानमसाल्याच्या नमुन्यांमध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट हा घटक असल्याचे आढळून आले होते ;

आणि ज्याअर्थी, असेही निदर्शनास आले आहे की, वर्षानुवर्षे गुटखा किंवा पानमसाला यांचे सेवन केल्याने ॲक्युट हायपर मॅग्नेशिआ होण्यामध्ये त्याची परिणती होते आणि काही वेळेस त्याची परिणती हृदयावरोध होण्यामध्ये (कार्डिॲक ॲरेस्ट) होते, तसेच टाटा मेमोरीयल हॉस्पीटल येथील संशोधनामध्ये असेही निदर्शनास आले आहे की, गुटखा किंवा पानमसाला यांच्या सेवनाने कर्कजन्य किंवा सह-कर्कजन्य परिणाम (कार्सीनोजेनिक व को-कार्सीनोजेनिक) होतात ;

आणि ज्याअर्थी, अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर यांनी असे प्रतिवेदन केले आहे की, गुटखा किंवा पानमसाला इत्यादी सेवनामुळे मुखाचा सबम्युक्योस फायब्रोसिस होतो, आणि अशा रुग्णांमध्ये वाढ होत आहे आणि म्हणून त्यावर तात्काळ नियंत्रण आणणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, टाटा इन्स्टिटयूट ऑप फंडामेंटल रिसर्च येथील संशोधनामध्ये असे निदर्शनास आले आहे की, गुटखा किंवा पानमसाला यांच्या सेवनामुळे मुखाचा कर्करोग (ओरल कॅन्सर) होण्याची शक्यता असते ;

आणि ज्याअर्थी, डॉ हेम्नर आणि टाटा इन्स्टिटयूट ऑप फंडामेंटल रिसर्च यांच्या संयुक्त अभ्यासानुसार असे निष्पन्न झाले आहे की, गुटख्याच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो ;

आणि ज्याअर्थी, शासकीय दंत महाविद्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून असे उघडकीस आले आहे की, गुटखा चघळल्यामुळे मुखाचा सबम्युक्योस फायब्रोसिस होतो, आणि अशा रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे ;

आणि ज्याअर्थी, सन २००९-१० मध्ये ग्लोबल ॲडल्ट टोबॅको सर्व्हे ऑफ इंडिया (गॅटस) यांनी केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये असे उघडकीस आले आहे की, ३५ टक्के प्रौढ व्यक्ती कोणत्याही एका प्रकारच्या तंबाखुच्या आहारी जातात आणि यापैकी २१ टक्के लोक धूम्र विरहीत तंबाखुचा वापर करीत असल्याचे आढळून आले आहे ;

आणि ज्याअर्थी, तंबाखू मिश्रीत गुटखा किंवा पानमसाला हे कोणत्याही नावाने ओळखले जात असले तरी, ते आरोग्यास अपायकारक आहेत ;

आणि ज्याअर्थी, गुटखा हा अन्नपदार्थ असून अलीकडे त्यामध्ये तंबाखू आणि निकोटीन आणि मॅग्नेशिअम कार्बोनेट हे घटकद्रव्य असल्याचे दिसून येते, आणि त्याप्रमाणे ही बाब अन्न सुरक्षा व

मानके (प्रतिबंध आणि विक्रीवरील निर्बंध) विनियम, २०११ यांचे विनियम २.३.४ तसेच अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थ मानके आणि अन्न अतिरिक्त घटक) विनियम, २०११ याचे विनियम ३.१.७ यांचा भंग करणारी आहे ;

आणि ज्याअर्थी, पानमसाला या अन्न पदार्थामध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट हा घटक असल्याने ही बाब अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थ मानके आणि अन्न अतिरिक्त घटक) विनियम, २०११ याच्या विनियम, ३.१.७ चा भंग करणारी आहे ;

आणि ज्याअर्थी, अन्न पदार्थामध्ये तंबाखु आणि/किंवा निकोटीन किंवा मॅग्नेशिअम कार्बोनेट यांचा वापर घटकद्रव्ये म्हणून गुटखा किंवा पानमसाला यामध्ये मोठ्या प्रमाणात होत असल्याने महाराष्ट्र राज्यात गुटखा व पानमसाला यांचे उत्पादन, साठा, वितरण किंवा विक्री यास प्रतिबंध करणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ याच्या कलम ३० अन्वये सार्वजनिक आरोग्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये कोणत्याही अन्न पदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण किंवा विक्री यांस प्रतिबंध करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत ;

त्याअर्थी, आता अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ (२००६ चा ३४) याचे कलम ३० चे पोट-कलम (२), खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी याद्वारे, ज्यामध्ये तंबाखू आणि/किंवा निकोटीन किंवा मॅग्नेशिअम कार्बोनेट हे घटकद्रव्ये समाविष्ट असलेला गुटखा आणि पानमसाला मग तो बाजारात कोणत्याही नावाने उपलब्ध असो आणि इतर कोणताही बाजारात स्वतंत्रपणे उपलब्ध असलेला पदार्थ की, जो अंतिमतः गुटखा किंवा पानमसाला म्हणून गठीत होऊ शकेल, या सर्वांचे महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठा, वितरण किंवा विक्री यांवर, हा आदेश महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीकरिता बंदी घालण्यात येत आहे.

**महेश झगडे,**

अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य,